नियमित दिवाणी दावा क्र. ३१/२०२०
प्रशांत पिंगळे वि. संतोष यादव व इतर
CNR No. MHRG090002032020

निशाणी क्रमांक ५ वरील आदेश

वादीने प्रस्तूतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम–३९ नियम १ व २ अन्वये दिला असून त्याची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

२] मौजे वरसगाव, ता. रोहा येथील ग्रामपंचायत हद्दीतील बिनशेती मिळकत गट क्र. ४४५ क्षेत्र ४० आर, जिच्या चतुःसिमा या पूर्वेस– प्रतिवादी क्र. ६ व ७ यांचे गट क्र. ४४१ मधील त्रिकोणी क्षेत्र व मुंबई गोवा महामार्ग, पश्चिमेस– गट क्र. ४४३, उत्तरेस– गट क्र. ४४८ आणि दक्षिणेस– गट क्र. ४४० अशा आहेत. (इथून पूढे यास वाद मिळकत असे संबोधण्यात येईल.) ही दाव्याचा विषय आहे.

३] वाद मिळकत ही वादीने दि. १२.२.२०१४ रोजी तिचे पूर्वीचे मालक यांच्याकडून अदलाबदली दस्तान्वये संपादीत केली असून त्यावर त्याची मालकी व ताबा आहे. वादीचा बिल्डर डेव्हलपरचा व्यवसाय असून वाद मिळकतीवर तो रहिवासी सदनिका व दूकान गाळयांची बहूमजली इमारत बांधत आहे. त्यासाठी त्याने संबंधीत कार्यालयांकडून आवश्यक त्या सर्व परवानग्या मिळविल्या आहेत. वाद मिळकत ही मुंबई–गोवा महामार्गास लागून असून त्याच्या पनवेल–इंदापूर या टप्प्याच्या रस्ता रूंदीकरणाकरीता सदर मिळकतीपैकी पूर्व–दक्षिण बाजूचे काही क्षेत्र संपादीत झाले आहे. सदर मिळकतीच्या पूर्व–उत्तर बाजूस प्रतिवादी क्र. ६ व ७ यांच्या मालकीचे गट क्र.

४४१ पैकी उत्तर–दक्षिण लांबीचे त्रिकोणी चिंचोळे क्षेत्र शिल्लक आहे.

४] प्रतिवादी क्र. ६ व ७ यांनी गट क्र. ४४१ पैकी २ गूंठे क्षेत्र प्रतिवादी क्र. १ व २ यांना, ३ गूंठे क्षेत्र प्रतिवादी क्र. ३ याला, २ गुंठे क्षेत्र प्रतिवादी क्र. ४ याला आणि ५ गूंठे क्षेत्र प्रतिवादी क्र. ५ याला असे वेगवेगळया खरेदीखतान्वये विक्री केले आहे. त्यानूसार ७/१२ उताऱ्यात या प्रतिवादींची नावे नोंदविण्यात आली आहेत. परंतू सदर खरेदी व्यवहार हे तूकडेजोड व तूकडेबंदी कायद्याच्या तूरतूदींविरूध्द आहेत. त्यामूळे अशा दस्तांमूळे प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना कोणतेही मालकीहक्क प्राप्त होत नाहीत. तसेच त्यांच्या नावे असलेल्या सातबारा उताऱ्यातील नोंदी बेकायदेशिर आहेत. सन २०१६ साली गट क्र. ४४१ पैकी महामार्गाच्या रूदीकरणासाठी संपादीत झालेले क्षेत्र वगळता वाद मिळकतीच्या उत्तर–पूर्व बाजूस लागून रस्त्यालगत सुमारे २.५ गूंठे त्रिकोणी चिंचोळे क्षेत्र शिल्लक राहात आहे. सदर मिळकत ही शेतजमीन असून राष्ट्रीय महामार्गाच्या मध्यरेषेपासून ३० मीटर अंतर सोडण्याची अट विचारात घेता प्रतिवादींना गट क्र. ४४१ मधील शिल्लक क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येत नाही. असे असतानाही त्यांनी सदर चिंचोळया त्रिकोणी जागेत वाद मिळकतीच्या दर्शनी जागेत घाईघाईने दूकानगाळयांचे बांधकाम करण्याची तयारी सुरु केली आहे. त्यासाठी त्यांनी खड्डेही खोदले आहेत.

५] याबाबत वादीने संबंधीत कार्यालयांकडे तक्रारी केल्या. परंतू लागलीच कूठलीही कारवाई करण्यात आली नाही. ते बांधकाम वाद मिळकत व इमारत समुहाच्या

दर्शनी भागात असल्याने वादीच्या इमारतीचा दर्शनी भाग झाकला जावून वादीच्या मिळकतीचे अवमूल्यन होवून वादीचे अपरिमीत नूकसान होणार आहे. तसेच त्या बांधकामामूळे वाद मिळकतीत अतिक्रमण होण्याचा धोका आहे. त्यामूळे वादीच्या रास्त उपभोगास व वहीवाटीस अडथळा येवून त्याचे नूकसान होणार आहे. सदर बांधकामाबाबत वादीने प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना समज दिली असता त्यांनी धमकीची भाषा वापरली. म्हणून वादीने प्रस्तूतचा दावा दाखल करून प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी वाद मिळकतीच्या दर्शनी पूर्व बाजूस गट क्र.४४१ मधील त्रिकोणी जागेत व वाद मिळकतीत अतिक्रमण होईल असे कूठलेही बांधकाम करू नये तसेच वाद मिळकतीवरील वादीच्या ताबे कब्जास अडथळा होईल असे कोणतेही कृत्य करू नये अशा तात्पूरत्या प्रतिबंधात्मक मनाई हूकूमाची विनंती केली आहे.

६] दाव्याकामी प्रतिवादी क्र. १ ते ५ हजर होवून त्यांनी प्रस्तूत अर्जास त्यांचे म्हणणे नि. क्र. १६ वर दाखल करून अर्जातील कथने नाकारली आहेत. त्यांच्या म्हणण्यानूसार वादीने दाव्यात मोघम कथने केली असून ती वस्तुस्थितीशी विसंगत आहेत. त्यांनी म्हटले आहे की, त्यांनी प्रतिवादी क्र. ६ व ७ यांच्याशी स्वतंत्र नोंदणीकृत दस्त केले असून त्यानूसार त्यांच्या त्यांच्या मिळकतीचे ते स्वतंत्र मालक व कब्जेदार आहेत. त्यावर त्यांचा हक्क व अधिकार आहे. सदर दस्त हे सन २००० ते सन २००२ या सालात करण्यात आले असून या प्रतिवादींनी सन २००३–०४ या कालावधीत बांधकामे केली आहेत. प्रतिवादी क्र. ५ याने रितसर परवानगी घेतली आहे.

प्रतिवादींकडून शासनाने बिनशेती दंड मोहिमेअंतर्गत दंड वसूल केला आहे. तसेच सदर बांधकामे नियमानूकूल करण्यासाठी नोटीसा बजावल्या व त्याप्रमाणे प्रतिवादींनी तजविज केली आहे. तसेच त्यांनी मोजणी खात्याकडून प्रत्यक्ष मोजणीही केली आहे. त्यांची बांधकामे सन २००३–०४ सालापासून अस्तित्वात होती. परंतू ती नादूरूस्त झाल्याने प्रतिवादींनी त्यांची नवसारणी दावा दाखल करण्यापूर्वीच केली आहे. वादी वस्तुस्थिती लपवून प्रतिवादींनी आता बांधकामे सूरू केली असे भासवित आहे. त्याचाच भाग म्हणून अतिक्रमणाचा तपशिल न देता त्याने त्याबाबत मोघम तक्रार केली आहे. वादीने त्याचा हक्क प्रथमदर्शनी शाबीत केला नाही. त्यामूळे वादीच्या लाभात मनाई हूकूम पारीत न केल्यास त्याला नूकसान संभवत नाही. याउलट मनाई हूकूम पारीत केल्यास वादी त्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादींच्या हक्कास बाधा आणेल, ज्याने या प्रतिवादींचे अपरिमित नूकसान होईल. या करणास्तव त्यांनी प्रस्तूतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. वादीने नि. क्र. २१ वर पूरसिस देवून प्रतिवादी क्र. ६ व ७ यांच्याविरूध्द प्रस्तूतचा अर्ज नॉट प्रेस केला आहे.

७] उभय पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. खालील मुद्दे विचारात घेऊन त्यांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे दिलेले आहे.

मुद्दे	निष्कर्ष
१) वादीने सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे काय?	होकारार्थी.

२)	न्यायाचा समतोल त्याच्या बाजूने झुकतो आहे काय ?	होकारार्थी.
३)	त्याच्या हक्कात मनाई हूकूम पारीत न केल्यास त्यांना अपरीमीत हानी पोहोचेल काय ?	होकारार्थी.
४)	काय आदेश ?	...अंतिम आदेशाप्रमाणे.

:: कारणमिमांसा ::

मुद्दे क्र.१ ते ३ करीता–

८] वरील मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने चर्चेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांची कारणमिमांसा एकत्रितपणे करण्यात आली आहे. वादीच्या म्हणण्यानूसार वाद मिळकत त्याच्या मालकी व ताब्यात असून त्यावर तो बांधकाम करीत आहे या संदर्भात त्याने दाखल केलेली कागदपत्रे पाहता गट क्र.४४५ मधील ४० गुंठे जमीन त्याने नोंदणीकृत दस्तान्वये तिचे पूर्वीचे मालक काशिनाथ खांडेकर व विठोबा खांडेकर यांच्याकडून अदलाबदली केल्याचे दिसून येते. त्यांच्या नावाची नोंद गट क्र.४४५ च्या सातबारा उताऱ्यात झाल्याचेही दिसून येते.

९] वाद मिळकत आणि गट क्र.४४१ मधील क्षेत्र हे एकमेकालगत आहे याबाबत उभय पक्षात दूमत नाही. वादीचे पुढे असे म्हणणे आहे की, सन २०१६ साली गट क्र. ४४१ मधील जमिनीचे काही क्षेत्र महामार्गाच्या रूंदीकरणासाठी संपादीत झाले असून त्या संपादनानंतर गट क्र. ४४१ मध्ये २.५ गूंठे त्रिकोणी क्षेत्र शिल्लक राहते. हे क्षेत्र वाद मिळकतीच्या उत्तर–पूर्व बाजूस असून रस्त्यालगत आहे. गट क्र. ४४१ मधील ही

मिळकत शेतजमीन असून राष्ट्रीय महामार्गाच्या मध्यरेषेपासून ३० मीटर अंतर सोडण्याची अट विचारात घेता प्रतिवादी क्र. १ ते ५ गट क्र. ४४१ मध्ये कूठलेही बांधकाम करू शकत नाहीत. यासंदर्भात प्रतिवादी क्र. १ ते ५ यांची कथने पाहता, त्यांनी म्हटले आहे की, त्यांनी सन २००० ते २००२ या कालावधीत नोंदणीकृत दस्तांन्वये गट क्र. ४४१ मधील मिळकती खरेदी केल्या असून त्या क्षेत्रांवर त्यांनी सन २००३–०४ या सालात बांधकामे केली आहेत. परंतू ती बांधकामे नादूरूस्त झाल्याने त्यांनी दावा दाखल करण्यापूर्वी त्यांची दूरूस्ती केली आहे.

१०]   प्रतिवादींनी दाखल केलेली खरेदीखते पाहता प्रतिवादी क्र.१ याने गट क्र.४४१ मधील २ आर, प्रतिवादी क्र.२ हिने १ आर, प्रतिवादी क्र.३ याने २ गुंठे, प्रतिवादी क्र.४ याने २ आर आणि प्रतिवादी क्र.५ याने ५ आर क्षेत्र त्याचे पूर्वीचे मालक शिवराम गणपत भालेकर यांच्याकडून वेगवेगळया नोंदणीकृत खरेदीखतान्वये खरेदी केल्याचे दिसून येते. परंतू सन २००६ साली प्रतिवादी क्र.५ यानेच ग्रामपंचायत, वरसगाव यांच्याकडून बांधकाम परवानगी मिळविल्याचे दिसून येते. त्या परवान्याच्या प्रतिचे अवलोकन करता प्रतिवादी क्र.५ याला नविन घर बांधण्यास परवानगी देण्यात आल्याचे नमूद आहे. परंतू त्या परवान्यामध्ये घर नंबर अथवा वॉर्ड नंबर नमूद नाही. त्यामूळे ही परवानगी कोणत्या मिळकतीबाबत देण्यात आली हे स्पष्ट होत नाही. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी गट क्र. ४४१ मध्ये सन २००३/२००४ या कालावधीत बांधकामे केल्याचे जरी गृहीत धरले तरीही त्याकामी त्यांनी रितसर परवानगी घेतल्याचे म्हटले

नाही. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ही बांधकामे नादूरुस्त झाल्याने त्यांनी दावा दाखल करण्यापूर्वीच त्यांची दुरूस्ती केली आहे. जरीही त्यांनी दुरूस्ती केल्याचे गृहीत धरले तरीही त्या दुरुस्तीसाठी त्यांनी परवानगी घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे त्यांनी केलेली बांधकामे ही सन २००३–२००४ सालापासून अस्तित्वात होती ही बाब सिद्ध होत नाही.

११] सदर बांधकामाबाबत वादीने दावा दाखल करतेवेळीची छायाचित्रे दाखल केली आहेत. त्यांचे अवलोकन करता, वाद मिळकतीलगत बांधकामास सुरूवात झाली असल्याचे दिसून येते. त्यानंतर वादीने दि. २२.६.२०२० रोजी छायाचित्रे दाखल केली आहेत. त्यांचे अवलोकन करता, वाद मिळकतीलगत काही प्रमाणात बांधकाम करण्यात आल्याचे दिसून येते. त्यामूळे या बाबी पाहता, प्रतिवादींनी केवळ दूरूस्ती केली हे त्यांचे कथन सिध्द होत नाही. दूसरी बाब अशी आहे की, प्रतिवादींनी दाखल केलेली कागदपत्रे पाहता, दि. २३.११.२०११ रोजी उपजिल्हाधिकारी, भूसंपादन रायगड यांनी गट क्र. ४४१ मधील भूधारकांना जमीन संपादनाबाबत नोटीस दिली होती. त्यात प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचाही समावेश होत. यावरून हे स्पष्ट होते की, गट क्र. ४४१ मधील २८२० चौ. मीटर जमीन पनवेल–इंदापूर या राष्ट्रीय महामार्ग क्र. १७ साठी संपादीत झाली आहे. त्यामूळे संपादनानंतर या गटात प्रतिवादी क्र. १ ते ५ यांच्या मालकीचे एकूण किती क्षेत्र शिल्लक राहिले याबाबतही त्यांनी कूठला खूलासा केला नाही.

१२] वादीने उप–विभागीय अधिकारी यांच्याकडे सदर बांधकामाबाबत तक्रार अर्ज केला होता. त्यात झालेल्या कार्यवाहीमध्ये उप–विभागीय अधिकारी यांनी दि. २६.६.२०२० रोजी ग्रामपंचायत/ग्रामसेवक, वरसगाव यांना पत्र दिले आहे. त्याचे अवलोकन करता प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी बांधकामासाठी वरसगाव ग्रामपंचायत यांची परवानगी घेतली नसल्याचे तसेच ते बांधकाम वादीच्या खूल्या जागेत सूरू केले असल्याचे नमूद आहे. ते बांधकाम विनापरवाना सूरू असून त्या बांधकामामूळे नॅशनल हायवेचे रीबीन डेव्हलपमेंट रूल्सचाही भंग होत असल्याचा सकृतदर्शनी निष्कर्ष नोंदविण्यात आला. ते बांधकाम अनधिकृत असल्यास ग्रामपंचायत, वरसगाव यांना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व तहसिलदार रोहा यांच्याशी समन्वय साधून ते थांबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सदर अर्जाकामी प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना नोटीसही बजावण्यात आली होती. परंतू ते अनूपस्थित राहिले.

१३] या पत्रासंदर्भात प्रतिवादी क्र. ५ याने स्वतःचे शपथपत्र नि. ३३ वर दाखल केले आहे. त्यात त्याने म्हटले आहे की, वादीने दि. २२.६.२०२० रोजी जैसे थे हूकूमासाठीचा अर्ज दिला होता. परंतू त्यात अतिक्रमणाबाबत स्पष्ट आरोप नाही. परंतू उप–विभागीय अधिकारी यांच्या पत्रात प्रतिवादींनी अतिक्रमण केल्याचा उल्लेख आहे. तसेच उप–विभागीय अधिकारी यांनी प्रतिवादींना सुनावणीची संधी दिली नाही व त्या पत्रातील निष्कर्ष हे नैसर्गिक न्यायतत्त्वांविरूध्द आहेत. त्याने पूढे असे म्हटले आहे की, न्यायालयात दावा दाखल केल्यानंतर प्रकरण न्यायप्रविष्ट असताना वादीला

उप–विभागीय अधिकारी यांच्याकडे याच प्रकारचा तक्रार अर्ज देता येत नाही.

१४] याअनूषंगाने वादीने दाखल केलेली कागदपत्रे पाहता त्याने दावा दाखल करण्यापूर्वी सदर बांधकामाबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, मंडळ अधिकारी, तलाठी, जिल्हाधिकारी, नगररचनाकार, ग्रामपंचायत वरसगाव व पोलीस निरीक्षक यांच्या कार्यालयांमध्ये अर्ज केले होते. त्यामूळे जरीही दावा दाखल केल्यानंतर त्याने उप–विभागीय अधिकारी यांच्याकडे अर्ज केला असला तरीही त्या अर्जाकामी आपले म्हणणे मांडण्याची प्रतिवादींना संधी देण्यात आली होती. परंतू ते त्या अर्जाकामी गैरहजर राहिले. दूसरी बाब अशी आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ५ करीत असलेले बांधकाम हे कायदेशिर संपूर्ण परवानग्या घेवून सूरू करण्यात आले आहे याबाबत त्यांनी कूठलाही खूलासा केला नाही अथवा त्याबाबतचा कागदोपत्री पूरावाही सादर केला नाही. त्यामुळे एकंदरीत याबाबी विचारात घेता प्रतिवादी क्र. १ ते ५ हे कोणतीही कायदेशिर परवानगी न घेता अनधिकृत बांधकाम करीत असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते.

१५] वादीने सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांनी दि. ९.३.२००१ रोजी पारीत केलेल्या शासन निर्णयाची प्रत दाखल केली आहे. त्या निर्णयानूसार अनागरी भागात राष्ट्रीय मार्गाच्या मध्यापासून ४० मीटर अंतरावर इमारत रेषा ठरविण्यात आली आहे. प्रस्तूत दाव्यात उभयपक्षांच्या कथनानूसार मुंबई–गोवा महामार्ग गेला असून तो गट क्र. ४४१ लगत आहे. त्यामूळे या रस्त्याच्या मध्यापासून ४० मीटर अंतरापर्यंत बांधकाम करता येत नाही असे सकृतदर्शनी दिसून येते. यासंदर्भात प्रतिवादी क्र. १ ते ५

यांचे असेही म्हणणे नाही की, ते करीत असलेले बांधकाम हे सदर रस्त्याच्या मध्यापासून ४० मीटरपेक्षा जास्त अंतरावर आहे. अशा परिस्थितीमध्ये या नियमाचाही भंग होत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

१६] वाद मिळकत ही गट क्र. ४४५ मध्ये आहे व गट क्र. ४४५ आणि गट क्र. ४४१ हे एकमेकालगत आहेत. वादीने स्पष्टपणे म्हटले आहे की, प्रतिवादी करीत असलेल्या बांधकामामूळे वाद मिळकतीवर अतिक्रमण होण्याचा संभव आहे. त्याने जरीही सदर बांधकामामूळे अतिक्रमण होत असल्याचे म्हटले नसले तरीही वाद मिळकत व गट क्र. ४४१ हे एकमेकालगत असल्याचे दिसून येते. त्यामूळे वाद मिळकतीवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दूसरी बाब अशी आहे की, जरीही प्रतिवादी क्र. १ ते ५ हे गट क्र. ४४१ मधील जमिनीवर बांधकाम करीत असले तरीही, ते बांधकाम संबंधीत कार्यालयांकडून पूर्वपरवानगी घेवून करण्यात आले नसल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते. त्या बांधकामामूळे वाद मिळकतीवरील वादीच्या रास्त उपभोगास अडथळा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीमध्ये वादी हा प्रतिवादींविरूध्द दावा दाखल करून मनाई हूकम मागू शकतो.

१७] आपल्या यूक्तिवादाप्रीत्यर्थ वादीच्या वि. विधीज्ञांनी मा. मुंबई उच्च न्यायालयाने पारीत केलेल्या **Smt Fatima Joao Vs. Village Panchayat Merces & anr. 2001(2) ALL M. R. 680.** या निकालाचा दाखला दिला आहे. त्यात मा. न्यायालयाने असा निकाल दिला आहे की, '*a neighbour who is affected, therefore, by an illegal construction, has an obligation in his*

favour based on which he can maintain a suit for perpetual injunction.' त्यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयाने पारीत केलेल्या **Subhash Krishna Kanitkar vs. The Bhivandi Nizampura Municipal, (2000) 3 BOMLR 573** या निकालाचाही दाखला दिला आहे. त्यात मा. न्यायालयाने असा निकाल दिला आहे की, '*This Court in numerous cases has held that no sympathy should be shown to the builder or any other persons whose construction is unauthorised.*' प्रस्तूत दाव्यात प्रतिवादी हे गट क्र.४४१ मधील क्षेत्रावर बांधकाम करीत असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते. परंतू त्या बांधकामासाठी त्यांनी कायदेशीर परवानग्या घेतल्याचे दिसून येत नाही. त्या बांधकामामुळे वादीच्या हक्कांना बाधा पोहोचत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. म्हणून उपरोक्त न्यायनिवाडे प्रस्तूत दाव्यास लागू होतात असे माझे मत आहे.

१८]   एकंदरीत वस्तूस्थिती, उभयपक्षांची कथने व दाखल कागदपत्रे पाहता प्रतिवादी क्र.१ ते ५ हे वाद मिळकतीलगत असलेल्या गट क्र. ४४१ मधील क्षेत्रावर बांधकाम करीत असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते. ते बांधकाम कायदेशीर परवानग्या घेवून सुरू असल्याचे दिसून येत नाही. याउलट वादीने संबंधीत कार्यालयांकडून आवश्यक त्या कायदेशिर परवानग्या घेवून वाद मिळकतीवर बांधकाम सुरू केले आहे. त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज नामंजूर करणे म्हणजे प्रतिवादी क्र.१ ते ५ करीत असलेल्या अनधिकृत बांधकामास संरक्षण देणे ठरेल. त्या बांधकामामुळे वाद मिळकतीवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून या सर्व बाबी विचारात घेता

वादीने सकृतदर्शनी केस सिद्ध केली आहे, न्यायाचा समतोल त्याच्या लाभात झूकतो आहे, तसेच तात्पूरता मनाई हुकूम पारीत न केल्यास त्याला अपरिमित हानी पोहोचेल असे दिसून येते. म्हणून प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत ठरेल असे माझे मत आहे. या कारणास्तव मी मूद्दे क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी देत मूद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१) अर्ज (निशाणी क्रमांक ५) मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र. १ ते ५, त्यांचे नोकर चाकर, एजंट अथवा या प्रतिवादींतर्फे इतर कोणीही या अर्जाच्या परि.क्र. १ मधील नमूद वाद मिळकतीवर अतिक्रमण होईल असे कुठलेही बांधकाम करू नये तसेच वाद मिळकतीवरील वादीच्या शांततामय ताब्यास कायदेशीर प्रक्रियेशिवाय अडथळा करू नये असा तात्पूरता मनाई हुकूम दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत अथवा पुढील आदेश होईपर्यंत पारीत करण्यात येतो.

३) प्रतिवादी क्र. १ ते ५, त्यांचे नोकर चाकर, एजंट अथवा या प्रतिवादींतर्फे इतर कोणीही वाद मिळकतीच्या दर्शनी पूर्व बाजूस गट क्र.४४१ च्या त्रिकोणी चिंचोळ्या जागेत कुठलेही बांधकाम करू नये असा तात्पूरता मनाई हुकूम दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत अथवा पुढील आदेश होईपर्यंत पारीत करण्यात येतो.

४) खर्चाविषयी दाव्याच्या अंतिम निकालावेळी विचार करण्यात येईल.

(आदेश खूल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

Digitally signed by Sameer Dilip Kamalakar
Date: 2020.07.10 15:15:19 +0000

स. दि. कमलाकर

दिनांक : १०/०७/२०२०

दिवाणी न्यायाधीश,
(कनिष्ठ स्तर), रोहा.